**RESEARCH DIRECTIONS**
ISSN: 2321-5488
IMPACT FACTOR : 5.1723(UIF)
VOLUME - 5 | ISSUE - 6 | DECEMBER - 2017

# बसवेश्वरांचे सामाजिक विचार

डॉ. सुदास रंगनाथ मोराळे[1] , निंगप्पा सिद्राम सोमगोंडे[2]
[1]राज्यशास्त्र विभाग प्रमुख, स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड माजी संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
[2]राज्यशास्त्र विभाग प्रमुख , जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,अणदूर ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद.


**प्रस्तावना:**

बसवेश्वरांच्या नेतृत्वाखाली सर्वप्रथम जनसामान्यांच्या अंतरात्म्यातील ध्वनी होउन जनमाणसांचे जीवन सुफलाम व्हावे म्हणून वचन साहित्याची सृष्टी निर्माण केली. सामान्यांना तोंड असूनही कंठातून आवाज निघत नव्हता. माणसांना मुक्या प्राण्यापेक्षा हीन वागणुक दिली जात होती. प्रेमासाठी प्रजेच्या उध्दारासाठी, प्रजाधर्माच्या उदयासाठी नव उदगाते म्हणून बसवेश्वर पुढे आले. "सत्य बोलणेच देवलोक, मिथ्या बोलणेच मृत्यूलोक, मृदू वचन वदणे सकल जप व तप जाणा. दया हेच धर्माचे मूळ अर्थात सत्य-शुध्द शारीरिक श्रमानेच धन मिळवणे हेच कैलास होय. सदाचार हाच स्वर्ग अनाचार हाच नरक. कैलास हा एक भूमिवर असलेला ओसाड पर्वत होय. तेथे राहणारा शिव खुळा व मूढ होय.

बसवेश्वरांना चातुवर्ण्य मान्य नव्हते. कारण त्याने माणसा-माणसात भेदभाव केला होता नव्हता. भेदभाव हा अमंगल असतो. जातीव्यवस्था ही वर्णव्यवस्थेचीच परिणीती होती. वर्णव्यवस्थेचे विकृत व विद्रुप रूप म्हणजे जातीव्यवस्था वेदानी चातुवर्ण्याचे समर्थन केले म्हणून बसवेश्वरांनी वेदांचे पावित्र्य अमान्य केले. वेद म्हणजे भेद आणि भेद म्हणजे पक्षपात ! अन्यायाची निर्मिती पक्षपातातून होत असते. बसवेश्वरांनी वेदांची कठोर समीक्षा केली. उच्चनिचता यावर माणसामाणसातील व जाती-जातीतील वर्णव्यवस्था आधारलेली होती. समाजाच्या गरजा भागविण्यासाठी श्रमविभागणी आवश्यक असते. हे बसवेश्वरांना मान्य होते; पण ती श्रमविभागणी सर्व जाती - जमातींना समान प्रतिष्ठा देउन व्हायला हवी; पण दुर्दैवाने तसे घडले नाही. वस्तुतः ती श्रमविभागणी नव्हती, उच्च-नीचतेवर आधारलेली श्रमिकांचीच विभागणी होती, असे बसवेश्वरांचे ठाम मत होते. बसवेश्वरांनी अतिशय खोलात जाउन प्रचलित समाजव्यवस्थेचा विचार केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देखील श्रमिकांच्या विभागणीवर बोट ठेवून वर्णव्यवस्थेवर घाव घातले. या सदंर्भातील बसवेश्वरांचे विचार आधुनिक समाजशास्त्रज्ञाला शोभून दिसतील असेच होते.

**उद्देश:**

महात्मा बसवेश्वरांच्या सामाजिक विचारांचा अभ्यास करणे.



महात्मा बसवेश्वरांच्या सामाजिक विचारांचा, समाजावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर केला असून द्वितीयक साधनांचा आणि विद्वानांच्या मतांचा आधार घेण्यात आला आहे.

**व्याप्ती:**

प्रस्तुत शोधनिबंधाची व्याप्ती महात्मा बसवेश्वरांचे सामाजिक विचार आहे.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad



113

**मर्यादा:**

महात्मा बसवेश्वरांच्या सामाजिक विचारापुरतेच मर्यादित आहे.

**बसवेश्वरांची सामाजिक क्रांती:**

बसवेश्वरकालीन समाज जातीहीन, अवरुद्ध अवस्थेत जीवन जगत होता. वर्णव्यवस्थाप्रणीत समाज जातीय अहंतेने विस्कळीत आणि दिशाहीन होता. समाजाची धर्माबाबत असणारी सजगता लोप पावलेली होती. धर्म म्हणजे काय? धर्माचे नेमके स्वरुप कोणते? धर्माची समाजप्रती असणारी बांधिलकी याबाबत धर्ममार्तंडांमध्ये मतभेद होते. धर्मासाठी समाज की समाजासाठी धर्म हा प्रश्न धर्ममार्तंड निर्माण करत होते. समाजाची झालेली ही दुरावस्था बसवेश्वरांना व्यथित करत होती. समाजाला या दुरावस्थेमधून फक्त खरा धर्मच बाहेर काढू शकेल, असा विश्वास बसवेश्वरांना वाटत होता.

प्रत्येक व्यक्तीतील स्वाभाविक विकारांच्या उद्रेकाची शक्यता लक्षात घेता जैन-बौध्दातील संन्यासवाद, निवृत्तीपरता त्यांना आवडली नव्हती. वैदिक धर्मातील होमहवन, दुर्मिळ पदार्थांचे यज्ञात हवन, मुक्या प्राण्यांचे बळी हे पाहवले नाही. खेकसाई-मेकसाई मरीआई, मुंज्या, मातामाय, म्हसोबा, यल्लमा यासारखी ग्रामदैवत कशाला हवीत?

राजेराजवाडे श्रीमत लोक देवळांना मदत करीत, त्यासाठी पुरोहितांना शेतीगावे, अग्रहार दानात दिली जात. गरीबांनी आपल्या पोटची मुले-मुली देवळाच्या सेवेसाठी दान करावी. या दानामुळे मोठे पुण्य मिळते. हीच मुले तरूण झाल्यावर मग वाघ्या, जोगती व पोतराज होत; तर मूली मुरळया, जोगतिणी जाणी व देवदासी होत. तनामनाच्या भुकेमुळे अध:पतित होउन वेश्या होत किंवा तमाश्याकडे वळत. हे अध:पतन व दुर्दशा पाहून त्यांचे सहृदय मन करूणेने गहिवरून येई.

देवळातील अभिषेकादी विधीतून, दक्षिणेतून गरीबांचे शोषण होई. रक्तमांसाचा नैवेद्य दिला जाई. सर्व जातीतील लोकांना मंदिर प्रवेशही नव्हता. तीर्थयात्रेतील सन्यांसी-सन्यांसीनी, हौसे-नवसे यात्रिक बाजारहाट, नशा, नाचतमाशे, वतनदारांचे रगेल रंगेल वर्तन यात कुठे होती निखळ विशुध्द भक्ती? मग खरा धर्म कोणता? खरे धर्माचरण कोणते?

सर्वच धर्मग्रंथ सामान्यत: पुरूष वर्गाने लिहिल्यामुळे स्त्रीजातीच्या भाव-भावना, वैशिष्टपूर्ण शारीरिक-मानसिक घडण याचा वेगळा विचार धर्मग्रंथांनी केलेला नव्हता. स्त्रीयांना विद्या शिकण्याचा मुंजीचा अधिकार नाही. धर्मग्रंथांनी समस्त स्त्रीजातीवर अन्यायच केलेला आहे. कर्म विपाकाच्या सिध्दांतानुसार मागचा जन्म, पुढचा जन्म, स्वर्ग-नरक, पाप-पुण्य अशा कल्पना पुरोहितांचे हित शाबूत ठेवण्यासाठीच धूर्तपणे केलेले दिसते.

दक्षिण भारतात ब्राम्हणांशिवाय सारेच शुद्र होते. सर्वांची भूक भागविणारा शेतकरी तोही शुद्र होता. या शुद्रांना, अस्पृश्यांना मंदिर प्रवेश नाही. एकाच गुन्ह्यासाठी जातिवर्णानिहाय वेगवेगळी शिक्षेची व्यवस्था पाहून सहृदयी बसवेश्वर मनो मनी विचार करू लागले. परंपरागत रूढी चालीविषयीच्या विद्रोहाचे क्रांतिकारी विचार त्यांच्या मनात निर्माण होऊ लागले.

**देवायलयातील लिंगपुजेपेक्षा, तळहातावरील इष्टलिंगपूजाच सर्वोत्तम:**

सर्वच धर्मपंथाची कृती व आचार पाहिल्यावर निखळ सात्विक समाधान देणारा एकही धर्मपंथ वाटला नाही. देवालयाबद्दलचे मत चांगले झाले नव्हते. त्यापेक्षा शिवप्रतिक इष्टलिंग तळहातावर ठेवून आपल्या घरीच शिवभक्ती करण्याचा विचार त्यांना सर्वोत्तम वाटला. यात परमेश्वर भक्ती यांच्या मध्ये कोण्या मध्यस्थाची-पुजारी, बडवे, भट, पुरोहित यांची गरज नव्हती. इष्टलिंगभक्ती घरोदारी, शेतात, व्यवसायस्थानी, प्रवासात, कुठेही होवू शकते. इष्टलिंग आष्टोप्रहार शरीरावर बाळगल्यामुळे दैनंदिन आचरणात उदभवणा-या वाईट विचार-विकारावर नियंत्रण ठेवण्याचे 'चिरंती विवेक नियंत्रक' म्हणून इष्टलिंग प्रभावीकार्य करू शकत होते. पवित्र इष्टलिंगामुळे आपला देहच होईल चालते-बोलते राऊळ! देहच होईल देवाचे देऊळ!! अशी सुलभ इष्टलिंगभक्ती लोकाभिमुख करण्याचा बसवेश्वरांनी निर्णय घेतला. या कार्यात सर्व शरण-शरणी दांपत्यांना सहभागी करून घेतले.

**निष्कर्ष:**

बसवेश्वरांनी दलितांना मंदिर प्रवेशा ऐवजी तळहातावर इष्टलिंग धारण करून देवाची पूजा आर्चा करता येईल हा उपाय सुचविला.

**संदर्भ ग्रंथ:**

१) सामाजिक क्रांतीचे उद्गाते महात्मा बसवेश्वर: माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे
२) डॉ. प्रभाकर पाठक:- चेतनाचिंतामणी श्री बसवेश्वर. पान. नं. ५६.
३) डॉ. प्रभाकर पाठक:- चेतनाचिंतामणी श्री बसवेश्वर. पान. नं. ४६.
४) समाजसुधारक महामंत्री महात्मा बसवेश्वर: डॉ. अशोक गंगाधर मेनकुदळे पानं. नं-८

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad



114